# महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार

**डॉ. डी. आर. बाड,** प्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग उमा महाविद्यालय पंढरपूर.

**श्री. आर.व्ही. कारंडे,** शंकराराव जगताप कॉलेज वाघोली.

---

**प्रस्तावना:** महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांमध्ये वर्ग समन्वयाची संकल्पना महत्त्वाची असून समाजात सर्वात खालच्या स्तरावर व्यक्तीला काय मिळते हा जगाचा सरासरी मापदंड ठरवले. आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी लहान उद्योग नष्ट न होता मोठ्या उद्योगांचा विकास घडवून आणल्यास देशाचा आर्थिक विकास साध्य होण्यास मदत होईल असे महात्मा गांधींना मनोमन वाटत होते. त्यासाठी महात्मा गांधीजींनी लोकांना खेड्याकडे चला असे प्रतिपादन केले विसाव्या शतकातील सर्वात महानिय व्यक्ती ठरलेल्या महात्मा गांधीजींच्या जीवनात संघर्ष व सामान्य माणसाचे कल्पना हे महत्त्वाचे घटक आढळतात जीवनाच्या सर्व पैलूंवर महात्मा गांधीजींनी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपली भूमिका मांडली शिक्षणाने व व्यवसायाने महात्मा गांधी वकील व उत्तम चांगली प्रसंगी व तत्व ज्ञान होते जीवनाचा परिपूर्ण अर्थ लावण्यासाठी त्यांनी स्वतःच्या जीवनात अनेक सत्याचे प्रयोग केले वैचारिक अनुभव विश्व समृद्ध करण्यासाठी महात्मा गांधीजींनीसातत्यपूर्ण संपन्न आणि गंभीर विषयाचे विवेचन केले**.**

भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत आर्थिक विचार मांडलेले दिसून येतात. प्राचीन भारतीय अर्थशास्त्रीय विचारांचा आढावा तीन कालखंडात घेता येतो. प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड व आधुनिक कालखंड प्राचीन साहित्यात सर्वात जास्त महत्वाचा संदर्भ ग्रंथ म्हणून कौटिल्य यांच्या 'अर्थशास्त्र' ग्रंथाचा उल्लेख केला जातो. मध्ययुगीन काळात म्हणजे हर्षवर्धन राजाच्या मृत्यूपासून ते ब्रिटीशांनी भारतात आपली सत्ता स्थापन केली तोपर्यंतचा काळ म्हणजेच इ.स. 648 ते 1800 पर्यंतचा काळ होय. या काळात ज्या काही सुधारणा केल्या त्या काळातील विचारांना भारतीय मध्ययुगीन काळातील आर्थिक विचार असे म्हणतात. आपल्या भारत देशामध्ये आधुनिक आर्थिक विचाराची सुरुवात 19 व्या शतकापासून झालेली दिसून येते. 19 व्या शतकामध्ये ब्रिटीशांचे आगमन भारतामध्ये झालेले होते. ब्रिटीशांनी भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक लुट करण्याचे धोरण राबविले होते. भारतीयांवर प्रचंड अन्याय होत होता, तसेच शोषण होत होते. या जुलमी शोषण करणाÚयाब्रिटीशांविरुद्ध ज्या भारतीयांच्या प्रतिक्रिया होत्या त्या म्हणजे आधुनिक काळातील भारतीय अर्थशास्त्रीय विचार होते. यात प्रामुख्याने दादाभाई नौरोजी, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडीत नेहरू, महादेव रानडे, गोपाळकृष्ण गोखले, इत्यादीची नावे घेता येतील.आधुनिक आर्थिक विचारवंतातील प्रमुख नाव म्हणजेच महात्मा गांधी होय. महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये सत्य, अहिंसा आणि स्वावलंबन या त्रिसूत्रीच्या विचारावरून इंग्रजांना शह दिला. महात्मा गांधीनी स्वातंत्र्य लढ्यासोबतच जे मौलिक आर्थिक विचार मांडले आहेत याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधातून घेणार आहोत.

**संशोधनाची उदिष्टये:-**

1) महात्मा गांधी यांच्या प्रमुख आर्थिक विचारांचा मागोवा घेणे.

2) स्वदेशी, ग्रामस्वराज्य संकल्पनांचा आढावा घेणे.

3) विश्वस्त विकेंद्रीकरण संकल्पनांचा अभ्यास करणे.

4) 'स्वावलंबन' या आर्थिक संकल्पनेचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती:-**प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला असून यासाठी महात्मा गांधीजीचे विविध ग्रंथ, लेख, मासिके, दैनिक तसेच इंटरनेट (संकेतस्थळे) यांचाही वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची गृहतके:-**

१) महात्मा गांधींचे व चार ग्रामीण विकासासाठी महत्वपूर्ण आहेत.

२) ग्रामीण विकासात अनेक आव्हाने.

**महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार :**भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधी यांचे योगदान आज फक्त भारतच नाही तर संपूर्ण जग जाणते. स्वातंत्र्य लढयात आपल्या सत्याच्या आणि अहिंसेच्या बळावर ब्रिटीशांना

नमवायला लावणारे महात्मा गांधी ऐकमेव दृष्टे भारतीय नेते होते. महात्मा गांधींनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक मार्ग दाखवला. त्यामुळेच गांधीनी फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये अजरामर झाले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांचा सक्रीय सहभाग होता. याच काळात महात्मा गांधीजीनीजे लिखाण केले, जे विचार मांडले, व्यक्त केले, तेच त्यांचे आर्थिक विचार होय. महात्मा गांधीनी जरी वेगळा आर्थिक नियम किंवा आर्थिक सिद्धांत विकसित केला नसला तरी त्यांचे आर्थिक विचार प्रचंड मोलाचे आहेत.

महात्मा गांधीजीवर जगभरातील महान विचारवंतांचा प्रभाव होता. टॉलस्टॉय, थोसे, रस्कीन, क्रोपोटकीन, गोखले यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. साधे राहणे व उच्च विचार, त्याग, समता, परोपकार, अहिंसा, बंधूता या गुणांचा गांधीजींनी पुरस्कार केला म्हणून गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे आजही नितांत गरजेचे आहे. गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी मांडलेल्या विविध संकल्पना विचारात घेण्यात आल्या. त्यांच्या अनेक संकल्पनाकी महत्वाच्या संकल्पना आणि महत्वाच्या प्रमुख आर्थिक विचारांचा मागोवा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधी यांचे योगदान आज फक्त भारतच नाही तर संपूर्ण जग जाणते. स्वातंत्र्य लढयात आपल्या सत्याच्या आणि अहिंसेच्या बळावर ब्रिटीशांना नमवायला लावणारे महात्मा गांधी ऐकमेव दृष्टे भारतीय नेते होते. महात्मा गांधींनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक मार्ग दाखवला. त्यामुळेच गांधीनी फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये अजरामर झाले.

**स्वावलंबन :-** महात्मा गांधींनीत्यावेळी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता. आजच्याप्रमाणेच त्यावेळी देखील ग्रामीण अर्थव्यवस्था महत्वाची होती. मात्र आजदेखील देशातील प्रत्येक शहरात वाढत जाणारा रोजगाराचा प्रश्न, वाढती गर्दी, गुन्हेगारी यामुळेच गांधीजीचा खेड्याकडे चला आणि स्वावलंबी जीवन जगा हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येक व्यक्ती प्रत्येक कुटुंब हे स्वावलंबी असले पाहिजे यावर गांधीजींनी अधिक भर दिला. वैयक्तिक आणि कौटुंबिक स्वावलंबनातूनच खेडी स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी होऊन भारताला आर्थिक विकास साधने शक्य होईल. स्वावलंबनासाठी ग्रामीण भागातील जनतेला स्वयंपूर्ण करण्यासाठी गांधीजींनी कुटीर उद्योगाचे महत्त्व पटवून दिले. 'चरखा' हे त्यांचे उत्तम उदाहरण त्यांनी सर्वांसमोर ठेवले. कमी भांडवलाच्या आणि जास्तीत जास्त रोजगार देणान्या म्हणजेच स्वावलंबी बनवणाऱ्या लहान उद्योगाची स्थापना करून स्वावलंबनाचा व ग्रामीण विकासाचा मंत्र गांधीजींनी दिला. प्रत्येकाने आपापली कामे स्वतः करून स्वावलंबी जीवन जगावे यावरही त्यांनी भर दिला. म्हणूनच गांधीजी स्वतः सूत काढायचे व त्यातून खादीचा कपडा तयार करून वापरायचे. हा स्वावलंबनाचा आदर्श गांधीजींनी जगाला घालून दिला. त्यांच्या या कार्यावरूनच गांधीजी फक्त बोलके सुधारक नव्हते तर करते सुधारक असल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच गांधीजीचे आर्थिक व सामाजिक विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.अशाप्रकारेगांधीजीनी स्वदेशी ग्रामस्वराज्य विश्वस्त विकेंद्रीकरण व स्वावलयन इत्यादी अनेक महत्वाचे आर्थिक विचार मांडले आहेत.

**स्वदेशी :-** महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांचा मुख्य आधार स्वदेशी आहे. स्वदेशी म्हणजे गांधीजींचे त्या काळातील राजकीय अस्त्र होय, विदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगाला आणि स्वदेशी उत्पादीत झालेल्या मालाला संरक्षण देणेहा या चळवळीच्या पाठीमागचा महात्मा गांधीचा मुख्य उद्देश होता. आपल्या देशांतील लोकांना लागणाऱ्या आवश्यक त्या वस्तूआपल्या देशातीलच उद्योगातून निर्माण केलेली असली पाहिजे. तरच देशातला उद्योग टिकू शकतो. आणि उद्योगाचा विकास साध्य होऊ शकतो. व यामुळे परदेशात जाणारी संपत्ती आपल्याच मायभूमीत राहू शकते. आणि यातूनच राष्ट्र स्वावलंबी बनू शकते म्हणूनच स्वदेशी वस्तूंचा वापर या विचारांवर गांधीजी आग्रही होते. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सुद्धा महात्मा गांधीचे 'स्वदेशी'चे विचार भारताच्या विकासासाठी अत्यंत महत्वाचे मानले जातात. म्हणूनच आजही स्वदेशी हे आर्थिक विचार आपल्यासाठी महत्वाचे आहेत.

ग्रामस्वराज्य भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारताचा विकास हा खेड्यांच्या विकासावर आधारलेला आहे. जर खेडी विकसित झाले तरच भारत विकसीत असे महात्मा गांधीजीचे मत होते. खेड्याचा विकास करण्यातून खेडी समृद्ध होतात. आणि त्यातून भारत देश समृद्ध होतो. म्हणून खेड्यांचे पुनरज्जीवन झाले

पाहिजे असे महात्मा गांधींचे स्वप्न होते. प्राचीन काळामध्ये भारतीय खेड़ी ही स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होती. उत्पादन विभाजन आणि उपभोग या तिन ही आर्थिक क्रिया खेडयांच्या पातळीवर एकाचवेळी घडत होत्या. एक खेड़ी दुसऱ्या खेड्यावर अवलंबून नव्हती पण आधुनिक काळात चित्र बदलून गेले आणि खेड्यांची स्वयंपूर्णतः लयास गेली. कच्चा माल शेतात तयार कायला लागला पण पक्का माल शहरात तयार होऊ लागला व जास्त किमतीला माल खरेदी करण्याची वेळ खेड्यांतील लोकांवर आली. खेड्यांतील सामान्य जनतेची त्यामुळे आर्थिक लूट होऊ लागलो. कारण अधिक किमती आकारून खेड्यातील पैसा, संपत्ती शहराकडे जाऊ लागली. यातून खेड्यांचे शोषण होऊन ग्रामीण खेडयातील लोकांचे उत्पन्न कमी झाले व खेडी पातळीवरील जनता बेकारी, दारिद्रय उपासमार या दुष्टचक्राच्या विळख्यात सापडली.

वरील प्रकारच्या दुष्टचक्राच्या समस्येपासून खेड्यांतील जनतेला सोडवायचे असेल तर भारतातील खेड्यांचे पुनरंज्जीवन झाले पाहिजे, असा विश्वास गांधीजांनी व्यक्त केला. भारतातील खेडी स्वयंपूर्ण, स्वावलंबी बनली पाहिजेत, तरच भारताचा कायापालट होऊ शकेल अन्यथा नाही. ग्रामस्वराज्य व स्वयंपूर्ण खेडी या संकल्पनेत महात्मा गांधीजींना पुढील बाबी अपेक्षित होत्या त्यात निटनेटकी ग्राम रचना, शाळा, धर्मशाळा, दवाखाना, प्रार्थना स्थळे, सार्वजनिक नाट्यगृह, करमणुकीच्या सोई, सार्वजनिक हॉल, खेळाचे मैदान, जनावरांची राखीच व्यवस्था, मुलभूत शिक्षण हे सर्व उपक्रम सरकारी पद्धतीने राबवावीत, पंचायत लोकशाही पद्धतीने खेड्यांचे शासन चालावे. स्वच्छता, नाला सफाई, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था दिवाबत्ती, खेड्यांचे रक्षण, हे त्या-त्या खेड्यांनीच करावेत. फळांची झाडे असावी, अन्न, वस्त्र, निवारा या बाबतीत खेडी स्वयंपूर्ण असावीत, न्यायदान असावे, जातिप्रथा नसावी, व्यवहार सहकार्य तत्वाने व्हावा, अहिंसा पूर्ण सत्याग्रह व असहकार हे एकमेव जनतेचे अस्त्र असावे. या सर्व सुविधा पुरवून खेड्यांचे पुनरज्जीवन करावयाचे असेल तर शिक्षण, आहार व दारिद्र्य या संबंधी प्रश्न व समस्या अगोदरच खेड्यांनी सोडवावी लागतील. अशा पद्धतीचे ग्रामस्वराज्याबद्दल मौलिक विचार महात्मा गांधीजींनी मांडलेले आहेत. आजही ग्रामस्वराज्या बाबतचे विचार 21 व्या शतकातही तितकेच गरजेचे आहेत. या विचारांच्या अंमलबजावणी शिवाय आजही देशाचा सर्वागीण विकास होणे शक्य नाही. म्हणून महात्मा गांधीच्या ग्राम स्वराज्य या संकल्पनेला अनन्य साधारण महत्व आहे.

**विश्वस्त संकल्पना :** महात्मा गांधी यांनी ने आर्थिक विचार मांडले आहेत, त्यातील एक अत्यंत महत्वाचा आर्थिक विचार म्हणजेच विश्वस्त कल्पना होय. गांधीजींनी ज्या उदात्त तत्त्वांचा पुरस्कार केला त्यात सत्य, अहिंसेबरोबरच अपरिग्रहाला स्थान आहे. अपरिग्रह म्हणजे संग्रह न करण्याची वृत्ती होय. त्यांच्या आदर्श समाजात ही वृत्ती गृहित असल्यामुळे उत्पन्न आणि संपत्तीच्या विषमतेला वाव नाही. परंतु ही अवस्था साध्य होईपर्यंत समाजातील श्रीमंत लोकांनी स्वतःला त्या संपत्तीचे मालक न समजता विश्वस्त समजावे, अशी त्यांची अपेक्षा होती. महात्मा गांधीजीच्या शब्दात श्रीमंत मनुष्याकडे त्याची संपत्ती तशीच राहील, पण त्याच्या वाजवी वैयक्तिक गरजांसाठी जेवढा भाग आवश्यक असल तेवढाच तो वापरेल, उर्वरित संपत्तीचा तो विश्वस्त असावा व तो भाग समाजासाठी खर्च कावा' जरी एखाद्या व्यापार किंवा उद्योगाच्या माध्यमातून नफा मिळविला असेल किंवा एखाद्याला वडिलोपार्जित धन प्राप्त झाले असेल, तरी तो संपूर्ण धनसंपत्ती त्याची नसून समाजाची असते. स्वतःच्या सामान्य गरजा भागविण्यासाठी त्यातील काही संपत्तीचा भाग वापरण्याचा अधिकार त्याला जरूर आहे. परंतु हे सामान्य जीवन सुद्धा असेच असावे, जे देशातील करोडो लोक जगतात. अशा पद्धतीची विश्वस्ताची कल्पना महात्मा गांधींनी मांडून जगासमोर आपल्या स्वतःच्या जगण्यातून आणि आधरणातून आदर्श घालून दिला. त्यातूनच त्यांनी साधी राहणी आणि उच्च विचारसरणीआमलात आणल्याचे दिसून येते म्हणून हे त्यांचे विचार अत्यंत प्रभावी आणि महत्वाचे आहे.

**विकेंद्रीकरण** – महात्मा गांधीजींच्या मते आर्थिक व्यवस्थेचे विभाजन स्वयंपूर्ण अशा छोट्या-छोट्या घटकांमध्ये करायला हवे. आर्थिक केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरणातील फरक याबाबतीत गांधीजीच्या मते केंद्रीकरण हे एकप्रकारे गुलामगिरीला आमंत्रण असून त्यामुळे विविध संकटांची साखळीच निर्माण होते. तर या उलट विकेंद्रीकरणामुळे मानवी गरजा मर्यादीत राहून त्या लवकर पूर्ण होतात. म्हणून विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचे

आर्थिक विचार महात्मा गांधींनी मांडले.महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांचा मुख्य आधार स्वदेशी आहे. स्वदेशी म्हणजे गांधीजींचे त्या काळातील राजकीय अस्त्र होय, विदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगाला आणि स्वदेशी उत्पादीत झालेल्या मालाला संरक्षण देणे

**निष्कर्ष :-**

1) महात्मा गांधीजीचे विचारच देशाला विकासाच्या मार्गावर नेऊन आर्थिक उन्नतीतून राष्ट्र उभारणी करण्यासाठी आजही अत्यंत महत्त्वाचे आहेत.

2) महात्मा गांधीनी दिलेला स्वदेशी नारा आजच्या जागतिकीकरणात सुद्धा अत्यंत महत्वाचा आर्थिक विचार असून याच विचारात आजही राष्ट्रहित असल्याचे दिसून येते.

(3) ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय देशाचा विकास शक्य नाही हे ग्राम स्वराज्याचे विचारच देशाला स्वयंपूर्ण बनवू शकतात हे स्पष्ट होते.

4) आजही भारताच्या सर्वांगीन विकासासाठी विश्वस्त संकल्पना ही अत्यंत महत्वाची आहे. याच विचारातून समता प्रस्थापित होण्यास मदत होते.

५) स्वावलंबनातून देशाच्या साधन सामग्रीचा आणि पर्यायाने स्वतःच्या क्षमतांचा वापर होऊन रोजगार व कुटीर उद्योगात वाढ होऊन राष्ट्रहीत साधले जाते हे दिसून येते. अशा प्रकारचं महत्वाचे निष्कर्ष या आर्थिक विचारातून स्पष्ट होतात.

**सारांश :-** महात्मा गांधीजींनी देशहिताच्या, समाजहिताच्या, उदाहरणार्थ- सत्य, अहिंसा, साधी राहणी, परोपकार, समता, बंधुता या गुणांचा आणि विचारांचा गांधीजीनी पुरस्कार केला. म्हणूनच त्यांच्या या गुणांचा अभ्यास करणे आज वैश्विक स्तरावर गरजेचे वाटते. या वरील विवेचनातून गांधीजीच्या विचारातील दुरदर्शीपणा आणि अपरिहार्यता दिसून येते. सध्या गांधीजीच्या विचाराबाबत असे म्हणता येईल की, आजचे जग गांधी विचार स्विकारण्याइतपत परिपक्व झालेले नाही. पण शेवटी आजही गांधी विचारांना पर्याय नाही. आजही महात्मा गांधीचे आर्थिक विचार व इतर सर्व विचारच देशाला आणि जगाला तारू शकतात. त्याच्या आर्थिक विचारातील स्वदेशी, ग्रामस्वराज्य, विश्वस्त, विकेंद्रीकरण, स्वावलंबन या विचारातूनच देशाचा आणि मानवाचा विकास शक्य आहे. म्हणूनच गांधीजीचे आर्थिक विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत हे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ -**

1) जागतिक आर्थिक विचारवंत - डॉ. एस. एस. खंदारे
१) ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन - गंगाधर कराळे
२) ग्रामीण विकासाचा मार्ग - प्रा. व्ही. एच. भटकर, प्रा निलेश निंबाळकर, प्रशांत पब्लिकेशन
३) लोकसेवक- प्रा. अमर जावळे, प्रा. भूषण काटे, प्रशांत पब्लिकेशन
४) भारतीय राजकीय विचारवंत - डॉ. डी.पी. देवरे, डॉ. डी.एस. निकुंभ, प्रशांत पब्लिकेशन
५) आधुनिक भारतीय, राजकीय विचारवंत डॉ. वा. भा. पाटील, प्रशांत पब्लिकेशन
६) मूल्य व्यवस्था गांधी विचार - डॉ. पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन, नांदेड
७) आर्थिक विचारांचा इतिहास- प्रा. पी. आर. कुमानाचे, डॉ. विलास खंदारे
८) कविमंडन विजय कृषी व ग्रामीण विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
९) पंडित नलिनी - गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
१०) गांधीजी, व्यास हरिप्रसाद, संग्राहक - ग्राम-स्वराज्य, नवजीवन प्रकाशन मन्दिर, अहमदाबाद.
११) महात्मा गांधी विचार- संपादक बालभारती प्रौढ व निरंतर शिक्षण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
१२) आर्थिक विचारांचा इतिहास- संपादक डॉक्टर जय पाटील
१३) महात्मा गांधी (राजकीय चरित्र) अनुवाद सरोज देशपांडे